# महाड सत्याग्रह ते भारतीय संविधान

**चवदार तळ्याच्या काठी, रोवून पाय खंबीर**
**राहिला उभा शोषितांचा, सेनानी रणगंभीर...**

आधुनिक भारत घडवण्यासाठी, संविधान निर्मीतीसोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत व्यापक आणि मोलाचे योगदान दिले आहे. त्यातील सर्वात महत्त्वाचे म्हणजे 20 मार्च 1927 रोजी पुकारलेला महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह. 20 मार्च 2026 रोजी ऐतिहासिक महाड सत्याग्रहाच्या शतकपूर्ती वर्षाला सुरूवात होत आहे.

## माणूसपणासाठीचा ऐतिहासिक सत्याग्रह



- **चवदार तळे सत्याग्रह** हा पाण्यासाठी नव्हे तर **माणूस म्हणून जगण्याच्या अधिकारासाठी** होता.
- या सत्याग्रहाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी **शोषितांच्या मनात स्वाभिमानाची ज्योत पेटवली, त्यांच्या मनातील भीती संपवली.**
- सर्वांना समानतेची वागणूक मिळेला आणि कोणावरही अन्याय होणार नाही – असा भारत घडवण्याचे समाजाचे स्वप्न जागवले.

भारताच्या संविधानाने अस्पृष्यता आणि जातीच्या आधारावर भेदभाव बेकायदेशीर ठरवले – त्याची बीजे ही महाडच्या लढ्यात आहेत

## बाबासाहेबांचे शैक्षणिक कार्य

- **"सरकारने शिक्षण मोफत व सक्तीचे करणे गरजेचे आहे"** - बाबासाहेबांच्या या भुमिकेमुळे 14 वर्षाखालील सर्वांना मोफत शिक्षणाची तरतूद केली गेली.
- **'गाव तिथे शाळा'** या धोरणानुसार गावोगावी सरकारी शाळा सुरू करण्यात आल्या.
- तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवण्यासाठी बाबासाहेबांनी **'पीपल्स एजुकेशन सोसायटीची'** स्थापना केली. आज या संस्थेची **30 पेक्षा जास्त महाविद्यालये** आहेत.

## भारताच्या विकासाच्या पायाभरणीत मोलाचे योगदान



- **आर्थिक धोरण**: रिजर्व बँकेची स्थापना, बँका व LIC सारख्या विमा कंपन्या, खाणी व पायाभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण बाबासाहेबांच्या विचारांतूनच झाले.
- **जल धोरण: दामोदर, हिराकूड** अशा मोठ्या धरण प्रकल्पांना त्यांनी मार्गी लावले.
- **उर्जा धोरण:** वीज क्षेत्र सरकारीच असले पाहिजे, त्याचे खाजगीकरण नको - ही त्यांची भूमिका होती.
- बाबासाहेबांच्या उर्जाधोरणाप्रमाणे 1948 साली **'केंद्रीय विद्युत प्राधिकरण'** स्थापन झाले आणि पूर्ण देशाला वीज पुरवणाऱ्या **'राष्ट्रीय विद्युत ग्रिड'**चा पाया रचला गेला.



खोती प्रथेविरोधात आंदोलन

## शेतकऱ्यांसाठी लढणारे बाबासाहेब

- शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या खोतीप्रथेविरोधात शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभे करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी **खोती प्रथा बंद पाडली.**
- बाबासाहेबांच्या भुमिकेनुसार स्वतंत्र भारताच्या पहिल्या सरकारने **जमीनदारी नष्ट** करून मोठ्या प्रमाणावर **शेतजमिनीचे वाटप** केले. **कुळ कायद्यानुसार "कसेल त्याची जमीन"** केली.
- सरकारने शेतकऱ्यांना **बी-बियाणे, खते, कर्ज, कृषी उत्पन्न बाजार समिती** उपलब्ध करायला पाहिजे, अशी बाबासाहेबांची भूमिका होती.

## महिला मुक्तीसाठी झटणारे बाबासाहेब

**"महिलांची प्रगती झाल्याशिवाय देशाची प्रगती होऊ शकत नाही"**, अशी बाबासाहेबांची ठाम भुमिका होती.

- बाबासाहेबांच्या प्रयत्नांमुळे महिलांना मिळालेले अधिकार -
  - **पगारी प्रसुतिरजेचा** अधिकार
  - समान कामाला **समान वेतन**
  - वारशाने **संपत्तीचा अधिकार**, घटस्फोटाचा, पोटगीचा आणि पुनर्विवाहाचा अधिकार
  - कामाच्या ठिकाणी **पाळणाघरे**
  - महिला **आरक्षण**

## कामगारांचे नेते बाबासाहेब

- **'स्वतंत्र मजूर पक्षा'**च्या माध्यमातून कष्टकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अनेक आंदोलने केली.
- **कामगार मंत्री** असताना कामगारांसाठी घेतलेले निर्णय:
  - **कामाचे तास 12 वरून 8** केले
  - **महागाई भत्ता** दिला
  - **पगारी सुट्टी** दिली
  - अपघातग्रस्त कामगाराला **नुकसान भरपाईची** तरतूद केली
  - कामगार संघटनेला मान्यता दिली

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान



आपल्या देशातील भक्ती परंपरेतील अनेक महान संतांची शिकवण आपल्या संविधानात आहे. **छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले** आणि **राजर्षी शाहू महाराज** यांनी ही मूल्ये समाजात रुजवली. याच विचारांतून प्रेरणा घेऊन बाबासाहेबांनी संविधान घडवले.

**बाबासाहेबांच्या आग्रहामुळे संविधानामध्ये मार्गदर्शक तत्वांचा समावेश** केला गेला. त्यानुसार:

- **गरीब-श्रीमंतांमधील दरी कमी करणे** सरकारची जबाबदारी आहे.
- लोकांना **चांगले शिक्षण, आरोग्य, पोषण, रोजगाराच्या संधी** देण्यासाठी पैसे नाहीत, असे कारण कोणत्याही सरकारने देऊ नये. **गोरगरीबांचे कल्याण करण्यासाठी सरकार बांधील असेल.**
- या देशाचे **सरकार हे धर्मनिरपेक्षच असावे** - सर्व धर्मांचे सरकारसमोर एकच स्थान असेल - ही बाबासाहेबांची ठाम भूमिका होती.

**चला, भीमप्रतिज्ञा घेऊया आणि भीमजयंती विचारांची जयंती म्हणून साजरी करूया!**




## भीमप्रतिज्ञा

**"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त मी अशी शपथ घेते/तो की, मी नेहमी बाबासाहेबांच्या विचारांवर चालेन, आणि कधीही जाती-धर्माच्या आधारे भेदभाव करणार नाही. मी महिलांचा आदर करेन. भारतीय संविधान सर्व जाती-धर्माच्या लोकांचे आहे, असे मी मानतो. संविधानाचा विचार मी जास्तीत-जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करेन. अशाप्रकारे विचारांची जयंती साजरी करणे, हेच माझे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन असेल.**
**जय भीम, जय संविधान!"**


## संविधान जागर अभियान

samvidhanjagar.org
samvidhan.jagar

निमंत्रक समिती: मा.न्या.बी.जी. कोळसे पाटील, मा.न्या.ए.एम. ठिपसे, तुषार गांधी, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन

स्वप्निल फुसे: 79723 45764 | डॉ.श्याम मुडे: 94047 08852 | श्रद्धा रेखा राजेंद्र: 92704 78335 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739